REGISTERED No. B. 3434




# अर्थ

वर्ष १५ पुणें, बुधवार तारीख १९ जानेवारी, १९४९ अंक ३







तयार कपड्यांचे व्यापारी महिंद्रकर ब्रदर्स बुधवार चौक, पुणें

दी
## बँक ऑफ कोल्हापूर, लि.

एच. एच. दी छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे
सरकारचे आश्रयाखालाल व त्यांचा फार मोठा
पाठिंबा मिळत असलेली.

*[ कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची
जबाबदारी मर्यादित असलेली. ]*

**स्थापनाः १९२६**

मुख्य कचेरी :
**सर बर्डवुड रोड, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.**

तार : BANKOP फोन : २८९

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ४०,०६,५०० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | २०,२६,००० रु. |
| वसूल | १०,१३,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | ७,८६,००० रु. |
| खेळतें भांडवल | २,८८,००,००० रु. हून अधिक |

**शाखा :**
(१) गुजरी (२) शाहुपुरी–कोल्हापूर (३) मलकापूर
(४) पेठ वडगांव (५) जयसिंगपूर (६) इचलकरंजी
(७) गडहिंग्लज (८) निपाणी (जि. बेळगांव) (९) मुंबई
(१०) मांडवी–मुंबई.

**—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—**
**मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट लॉकर्सची उत्तम व्यवस्था होत आहे.**

व्ही. ए. सावंत, जनरल मॅनेजर.

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

**हेड ऑफिस : पुणें शहर**

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा,
श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक )
पे-ऑफिसः—खोपोली ( जि. कुलाबा )

श्री. के. वि. केळकर M. A., LL. B. (वकील) ( अध्यक्ष ) | श्री. वी. वी. वाळवेकर ( उपाध्यक्ष )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ३,९८,२८५ |

**एकूण खेळतें भांडवल ५३ लाखांचे वर**

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

श्री. रा. वा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
} *मॅनेजिंग डायरेक्टर.*

# आगाऊ तरतूद करा

आपल्या शेतीवरील पुढें होणारी पाणीपुरवठ्याची अडचण दूर करण्यासाठी आतांच पंप व एंजिन्सची ऑर्डर द्या.

— चौकशी करा —

केळकर बंधु, बुधवार चौक पुणें २.


## विविध माहिती

**रेडिओचा कारखाना**—दि नॅशनल रेडिओ अँड एंजिनिअरिंग कंपनी, ह्या मुंबईंतील कंपनीनें एका ब्रिटिश कंपनीच्या सहाय्यानें हिंदुस्थानांत रेडिओचा कारखाना काढण्याचा विचार केला आहे. रेडिओ व त्यांचे भाग ह्या कारखान्यांत तयार केले जातील. ज्या ब्रिटिश कंपनीशी वरील कंपनी करारबद्ध झाली आहे, तिनें युद्ध-काळांत ब्रिटिश सरकारला राडारचीं यंत्रें पुरविलीं होतीं.

**कोळशाच्या खाणी सरकार चालविणार**—मध्यप्रांताच्या द्रुग जिल्ह्यांतील कोळशाच्या खाणी मध्यप्रांताचें सरकार स्वतःच चालविणार आहे. ह्या खाणी खोर्बा येथें असून, खाणींतील कोळशाचा उपयोग करून जवळच एक लोखंडाचा व पोलादाचा कारखाना काढण्याच्या दृष्टीनें सरकारनें नुकतीच पहाणी केली. मध्यप्रांताचे मुख्य प्रधान श्री. रविशंकर शुक्ल, ह्यांनीं प्रांतांतील चुन्याच्या व कोळशाच्या खाणींचा आपल्या एका भाषणांत नुकताच उल्लेख केला होता. ह्या खाणी खाजगी मालकांना न देतां सरकारच्या मालकीच्या ठेवण्याचा विचार त्यांनीं त्यावेळीं बोलून दाखविला होता.

**ओरिसांत अल्युमिनमचा धंदा**—ओरिसा सरकारनें प्रांतांतील अल्युमिनम तयार करणाऱ्या कारखान्यांना उत्तेजन देण्याचें ठरविलें आहे. परदेशांतील अल्युमिनमच्या कारखान्यांना टक्कर देतां यावी म्हणून प्रांतांतील कारखान्यांना विशेष सवलती देण्यांत येणार आहेत. ओरिसांत अल्युमिनम तयार करण्यासाठी लागणारे बॉक्साइट भरपूर असून त्यासंबंधीं प्रांतिक सरकार आतां अधिक संशोधन करूं लागलें आहे.

**ब्रिटनचा शिक्षणावर वाढता खर्च**—१९४९ मध्यें ब्रिटिश सरकारच्या शिक्षण-खात्यानें ५,५०,००० पौंड एवढी रक्कम शाळांच्या इमारतींसाठी खर्च करण्याचें ठरविलें आहे. ही रक्कम १९४८ पेक्षां दुप्पट आहे. ह्याशिवाय तांत्रिक शिक्षणांतील तांतडीच्या बाबींकडे अधिक लक्ष पुरविण्यांत येणार आहे. कायद्याप्रमाणें ज्या मुलांना सक्तीनें शिकविलेंच पाहिजे, अशा मुलांच्या गरजांकडेहि अधिक लक्ष देण्यांत येणार आहे.

**ब्रिटनमध्यें स्त्रियांची संख्या अधिक**—गेल्या जून अखेर संपलेल्या सहा महिन्यांत ब्रिटनची लोकसंख्या २,७४,००० नीं वाढली. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या आकड्यांवरून असें दिसून येतें कीं, ब्रिटनमध्यें पुरुषांच्या संख्येपेक्षा स्त्रियांची संख्या १५,१२,००० नें अधिक आहे. ह्या संख्येंत ३० ते ४४ वयाच्या आणि ५० ते ७० अगर अधिक वयाच्या स्त्रिया ज्यास्त आहेत. जून अखेर ब्रिटनमधील पुरुषांची संख्या २,४२,६०,००० आणि स्त्रियांची संख्या २,५७,७२,००० होती.

**रस्तेदुरुस्तीसाठी खर्च**—बिहार सरकारनें प्रांतांतील लोकल बोर्डांच्या कक्षेंत असणाऱ्या रस्त्यांची दुरुस्ती करण्यासाठी प्रांतिक उत्पन्नांतून १७४ लाख रुपये मदत म्हणून देण्याचें ठरविलें आहे. बिहारमधील रस्ते युद्धकालापूर्वी बऱ्या स्थितींत होते. परंतु हल्लीं ते फारच खराब झाले असल्यानें त्यांना पूर्व-परिस्थितीवर आणणें तरी निकडीचें झालें आहे.

**जोधपूर संस्थानांतील शिक्षण**—जोधपूरच्या सरकारनें संस्थानमधील सर्व जातीय शिक्षण-संस्था बंद करण्याचें ठरविलें आहे. ह्या सर्व संस्था ता. १ जुलै, १९४९ पासून सरकारनें आपल्या नियंत्रणाखालीं चालविण्याचें ठरविलें आहे.

**सहकारी बँकेला सरकारी मदत**—जमीनविषयक सुधारणा करण्यासाठी बॉंबे प्रॉव्हि. को. लँड मॉर्टगेज बँकेला आर्थिक मदत देण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. सरकारच्या शेतकी खात्यानें बंडिंग, विहिरी खोदणें, शेतीची यंत्रसामुग्री बसविणें, इत्यादि कामांना मोठ्या प्रमाणावर सुरवात केली आहे. शिवाय ३॥ ते ४॥ टक्के दरानें कर्जें देण्यालाही सुरवात केली आहे. बँकेला ६ टक्क्याच्या खालीं शेतकऱ्याला व्याजानें रक्कम देणें परवडत नाहीं; म्हणून बँकेला परवडणारा व्याजाचा दर आणि सरकार वेळोवेळीं ठरवील तो व्याजाचा दर ह्यांच्यांतील फरकापुरती मदत बँकेला देण्याचें सरकारनें ठरविलें आहे.

**नवीन एक रुपयावाल्या नोटा**—हिंदुस्थान सरकार सध्या एक रुपयाच्या नवीन नोटा छापीत आहे. ह्या नोटांवर राजाच्या प्रतिमेच्या ऐवजीं अशोकस्तंभाचें चित्र देण्यांत येणार आहे. नाण्यावरहि ह्या स्तंभाची प्रतिमा देण्यासंबंधीं विचार चालू आहे. दोन रुपयाच्या अगर त्याहून अधिक किंमतीच्या नोटा तूर्त सध्याप्रमाणेंच निघणार आहेत. तथापि, त्यांच्यावरील चित्रहि बदलण्यांत येण्याचा संभव आहे.

**केमिस्ट्रीसंबंधीं नोबेल पारितोषिक**— १९३९ सालांतील केमिस्ट्रीसंबंधीचें नोबेल पारितोषक दोघा जर्मन शास्त्रज्ञांना देण्यांत आलें होतें. परंतु त्यावेळीं तें पारितोषिक घेण्याला हिटलरनें त्यांना मना केली होती. आतां त्या शास्त्रज्ञांना हें पारितोषिक देण्याचा विचार पारितोषिक समिति पुन्हां करीत आहे असें समजतें.

**गुजराथमधील बंदरें**—सौराष्ट्र सरकारनें गुजराथमधील जामनगर, भावनगर, नवलाखी आणि पोरबंदर ह्या बंदरांच्या व्यवस्थेसाठीं स्थानिक सल्लागार समित्या नेमल्या आहेत असें समजतें.

**मद्रास कॉर्पोरेशनचें अंदाजपत्रक**—मद्रास कॉर्पोरेशनच्या १९४९-५० च्या अंदाजपत्रकांत १४,७०,००० रुपयांची तूट येत आहे. अंदाजी उत्पन्नाचा आकडा १६० लाखांचा असून खर्चाचा आंकडा १७५ लाखांचा आहे.

**बडोद्यांतील खेड्यांची सुधारणा**— १९५४ च्या सुमारास बडोदा संस्थानांत संपूर्ण दारुबंदी अंमलांत आणण्याचा त्या सरकारचा विचार आहे. त्याचप्रमाणें प्रत्येक जिल्ह्यांत एक ग्रामसुधारणा केंद्रहि उघडण्यांत यावयाचें आहे. संस्थानच्या सरकारनें मध्यवर्ती सरकार आणि मुंबईचें प्रांतिक सरकार ह्यांचे कांहीं मजूर विषयक कायदेहि स्वीकारले आहेत.

**गुरांसाठी चराईचीं रानें**—जयपूर, मारवाड आणि इतर कांहीं संस्थानांतून गुरांना चरण्यासाठीं रानें नसल्यामुळें त्यांची उपासमार होत आहे. राजस्थान सरकारनें सुमारें २० ते २५ हजार गुरांना चराईचीं रानें देण्याचें कबूल केलें आहे. त्याचप्रमाणें, मध्यभारत सरकार व भोपाळ सरकार ह्यांनींही ५० हजार गुरांची सोय आपल्या हद्दींत लावण्याचें ठरविलें आहे.

# अर्थ

बुधवार, ता. १९ जानेवारी, १९४९





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

## इंडोनेशिअन प्रजासत्ताकांवर डचांचें आक्रमण

### पं. नेहरूंनीं बोलाविलेल्या परिषदेची पार्श्वभूमि

दुसऱ्या महायुद्धानंतर पूर्वेकडील आशिआंतर्गत राष्ट्रांतील स्वातंत्र्याची लालसा विशेष जोरानें उफाळून वर आली. हिंदुस्थान, सिलोन, ब्रह्मदेश, मलाया, इंडोचायना, इंडोनेशिया ह्या सर्वच राष्ट्रांतून पाश्चात्य राष्ट्रांच्या राजकीय पाशांतून मुक्त होण्याच्या चळवळी युद्धापूर्वींही चालू होत्या. त्याचा फायदा घेऊन जपाननें 'आशिआ आशिआंतील लोकांसाठीच राहिला पाहिजे,' अशी घोषणा केली. आग्नेय आशिआंत दुसऱ्या महायुद्धांत जपाननें जी राघोभरारी मारली, तिचें थोडेफार रहस्य ह्या घोषणेंत सांपडतें, असें म्हणण्यास हरकत नाहीं. इंग्लंड, फ्रान्स, हॉलंड, इत्यादी राष्ट्रांनीं पूर्वेकडील आपल्या वसाहतींचा उपयोग कच्च्या मालाचीं स्वस्त आगरें आणि पक्क्या मालाच्या हुकमी बाजारपेठा म्हणूनच केवळ केला, ही गोष्ट आतां सर्वमान्य झालेली आहे. अर्थशास्त्राच्या परिभाषेंत सांगावयाचें तर सर्व वसाहती प्राथमिक उत्पादकीय अवस्थेंतच राखण्याचा पाश्चात्य राष्ट्रांनीं खटाटोप केला. त्यामुळें वसाहतींतील लोकांचे जीवनाचें मान अत्यंत निकृष्ट राहिलें, इतकेंच नव्हें तर, पाश्चात्य राष्ट्रांशीं संबंध येण्यापूर्वी वसाहतींतील उद्योगधंदे आणि शेती ह्यांत असलेला समतोलपणा जाऊन त्या ऐवजीं दलाली आणि शेती ह्यांच्यावरच अधिकाधिक लोक अवलंबून राहूं लागले. इतर वसाहतींप्रमाणें इंडोनेशियांतहि अशीच परिस्थिति उत्पन्न झाली, ह्यांत नवल नाहीं. इंडोनेशिआंतील जाव्हा-सुमात्रासारख्या बेटांत जे कांहीं आधुनिक उद्योगधंदे निघाले ते संपूर्णपणें डच राज्यकर्त्यांच्या नियंत्रणाखालीं होते.

१९४५ च्या सप्टेंबरमध्यें जपानचा पराभव झाला. त्याबरोबर सर्व आग्नेय आशिआंत कमी-अधिक प्रमाणांत चालू असलेल्या स्वातंत्र्याच्या चळवळीनें सशस्त्र बंडाचें स्वरूप उघडपणें धारण केलें. सुमात्रा-जाव्हा आदीकरून डचांच्या वसाहतींतही हाच प्रकार झाला. डचांची ह्या बेटांतील सत्ता तद्देशीय लोकांच्या बंडापुढें टिकून रहाणें अशक्य होतें. पण इंग्लंडनें आणि अमेरिकेनें फ्रान्सला आणि हॉलंडला मदत करून त्या देशांचीं साम्राज्यें राखलीं. इंग्लंड-अमेरिकेनें अशी मदत केली नसती तर इंडोचायना आणि इंडोनेशिआ स्वतंत्र झाले असते, ह्याविषयीं शंका बाळगण्याचें कारण नाहीं. आज इंडोनेशिआंत, तेथील जनतेच्या पुढाऱ्यांनीं स्थापन केलेलें प्रजासत्ताक राज्य आणि हॉलंडचें राज्य अशा दोन राजवटी चालू आहेत. ह्या दोन राजवटींत तडजोड घडवून आणण्याचे प्रयत्न चालू आहेत. तथापि त्यांना अजून यश आलेलें नाहीं. उलट, डच सरकार अधूनमधून लष्करी आक्रमण करून अधिकाधिक प्रदेश आपल्या हुकमतीखालीं आणण्याची कारवाई करीत आहे. ता. २५ मार्च, १९४७ रोजीं डचांचें सरकार आणि इंडोनेशिअन प्रजासत्ताक राज्य ह्यांच्यांत एक करार करण्यांत आला. ह्या कराराप्रमाणें सुमात्रा, मदुरा आणि जाव्हा हीं बेटें प्रजासत्ताक राज्यांत समाविष्ट करण्यांत आलीं. ह्याला अपवाद म्हणजे बटेव्हिआ, सुरबाया इत्यादि शहरें होत. हीं शहरें डच लष्करानें व्यापलीं होतीं; तीं डच सरकारकडेच ठेवण्यांत आलीं. डचांच्या ताब्यांतील प्रदेशांत सुमारें १ कोटी, २० लाख इतके लोक होते. उलट, प्रजासत्ताकांच्या ताब्यांतील प्रदेशांत लोकसंख्या ६ कोटींच्या आसपास आहे. इंडोनेशिआ ह्या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या द्वीपसमूहांत पुष्कळ बेटें असलीं तरी आर्थिक दृष्टीनें त्यांतील दोन बेटेंच सगळ्यांत अधिक महत्त्वाचीं आहेत. तीं म्हणजे जाव्हा आणि सुमात्रा. इंडोनेशिआंत प्रामुख्यानें तयार होणारा माल म्हणजे रबर, साखर आणि तांदूळ; ह्या तीन वस्तूंच्या उत्पादनावर आणि विनिमयावर इंडोनेशिआंतील जनतेचें आर्थिक जीवन बऱ्याच प्रमाणांत अवलंबून आहे. सुमात्रा आणि जाव्हा ह्या बेटांतच वरील वस्तूंच्या उत्पादनाचें विशेष केंद्रीकरण झालेलें आहे. ह्या वस्तूंची निर्यात करून त्यांच्या बदला कापडासारख्या रोजच्या जीवनाला लागणाऱ्या वस्तूंची आयात करणें प्रजासत्ताक राज्याला अत्यंत आवश्यक आहे. परंतु हें धोरण अमलांत आणण्यास डचांची आडकाठी आहे. युद्धाची समाप्ति झाल्यापासून डच बोटींनीं प्रजासत्ताक राज्याची नाकेबंदी चालविली आहे. त्यामुळें प्रजासत्ताक सरकारला निर्यात करतां येणें अशक्य झालेलें आहे. हिंदुस्थानसारखा देश तांदूळ घेऊन त्या बदला कापड देऊं शकेल. रबराचीही तीच गोष्ट; आज जगांत रबराला फार मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. जगांत रबर निर्माण करणारे जे देश आहेत त्यांत जाव्हा आणि सुमात्रा हे दोन प्रमुख आहेत. डचांच्या इंडोनेशिआंतील सत्तेला धक्का लागला तर इंग्लंड-अमेरिकेला रबर व तेलासारख्या महत्त्वाच्या वस्तू मिळणें कठीण जाईल. डच साम्राज्यसत्ता स्थिरावणें अशा रीतीनें इंग्लंड-अमेरिकेच्या प्रत्यक्ष आर्थिक फायद्याचें आहे. ता. २० जानेवारीला दिल्लीला आशिआंतील राष्ट्रांची परिषद पं. नेहरू ह्यांनीं भरविण्याचें ठरविलें आहे. ह्या परिषदेंत मुख्यत: पुढील मुद्यांबाबत विचार करण्यांत येईल असें वाटतें. ( १ ) आग्नेय आशिआंत पाश्चात्य साम्राज्यशाही आपलें बस्तान पुन्हां बसविण्याचा विचार करीत आहे. ह्या कारवाई-विरुद्ध आशिआंतील राष्ट्रांनीं एकजूट करणें आवश्यक होऊन बसलें आहे. ( २ ) अमेरिकेची मदत साम्राज्यशाही विरोधी राष्ट्रांना मिळण्यापेक्षां साम्राज्यवादी राष्ट्रांनाच मिळण्याचा अधिक संभव दिसत आहे.

डचांचें आक्रमण सुरू झाल्यावर मार्शल योजनेप्रमाणें हॉलंडला मिळणारी मदत बंद करण्यांत यावी, अशी विनंति इंडोनेशिअन प्रजासत्ताक सरकारनें केली होती. त्यावरून मार्शल मदत योजनेंतील साहित्य डचांनीं आक्रमणासाठी वापरलें अशी शंका घेण्यास बळकट जागा आहे. पाकिस्तान आणि हिंदुस्थान ह्यांच्या पश्चिमेला आणि पूर्वेला इंग्लंड-अमेरिकेच्या अंकित असलेल्या वसाहती आहेत. मध्यपूर्वेंत ब्रिटनचें राजकीय वर्चस्व अद्यापही आहे. मलाया, ब्रह्मदेश, इंडोनेशिआ येथील अस्वस्थतेचा फायदा घेऊन ह्या वसाहती कायम ठेवण्याच्या प्रयत्नांत इंग्लंड-अमेरिकेचा हात असावा अशी शंका व्यक्त करण्यांत येत आहे. अशा परिस्थितींत संयुक्त-राष्ट्र-संघटना आशिआंतील राष्ट्रांचें स्वातंत्र्य राखूं शकली नाहीं, तर आशिआंतील राष्ट्रांना आपली स्वतंत्र जूट करावी लागेल. आशिआंतर्गत राष्ट्रांची अशी जूट करावी लागल्यास तिचें पुढारीपण हिंदुस्थानला स्वीकारावें लागेल असें दिसतें.

## दुष्प्राप्य हुंडणावळ मिळविण्यासाठी निर्गतींत वाढ

### श्रीराम कमिटीचा अहवाल

निर्यातींत वाढ करून डॉलरसारख्या दुष्प्राप्य हुंडणावळी मिळविण्यासाठी काय करावें, ह्याचा विचार करण्यासाठी हिंदुस्थान सरकारच्या एक्सपोर्ट ॲडव्हायजरी कौन्सिलनें सर श्रीराम ह्यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमिटी नोव्हेंबर, १९४८ मध्यें नेमली होती. ह्या कमिटीनें जो अहवाल तयार केला आहे, त्यांत सर्वसाधारणपणें निर्यातीवरील बंधनें काढून टाकण्याची शिफारस करण्यांत आलेली आहे. कमिटीनें अहवालांत विचार केलेल्या कांहीं बाबी पुढील-प्रमाणें आहेत:—हिंदुस्थानांत येणाऱ्या परदेशीय हौशी प्रवाशांची संख्या वाढविणें, डॉलरच्या कक्षेंत येणाऱ्या देशांना कच्चा ताग, तागाचा तयार माल, तेलें आणि गळिताचीं धान्यें, चहा, कापड, अभ्रक, लाख, मँगेनीज, कातडीं इत्यादि वस्तूंची निर्यात अधिक प्रमाणांत करणें.

परदेशीय प्रवाशांना हिंदुस्थानांत प्रवास करण्यास आकर्षण वाटावें म्हणून, त्यांच्या प्रवास-परवान्यावर 'सब ठीक' चा शेरा त्वकर देण्याची व्यवस्था करावी, त्यांच्याकरितां रेल्वेंत जागा मिळण्याची विशेष सवलत द्यावी, हॉटेलसमधून त्यांना योग्य अशी रहाण्याची व्यवस्था करावी आणि हिंदुस्थानांतील प्रवासाच्या सोईचा आणि आकर्षकतेचा परदेशांतून प्रचार करावा,इत्यादि उपाय कमिटीनें सुचविले आहेत. कच्च्या तागाच्या निर्यातीची अधिकात अधिक मर्यादा ९ लाख गांठी असावी असा अभिप्राय व्यक्त करण्यांत आला आहे. तथापि, हिंदच्या तागाच्या धंद्याच्या हिताच्या दृष्टीनें तागाच्या निर्यातींत कमी-अधिक फरक करण्याची सवड सुचवण्यांत आली आहे. तागाच्या तयार मालासंबंधीं सरकारच्या परवान्याच्या पद्धतीचें स्वागत करण्यांत आलें आहे. शेंगदाणा आणि शेंगदाण्याचें तेल ह्यांवर सध्या जो निर्यातीचा कर घेण्यांत येतो त्यामुळें डॉलरच्या परिसरांतील देशांतून त्यांचा खप होणें अवघड जात आहे, इतकेंच काय पण इतर देशांतूनही आळशी व आळशीचें तेल ह्याचीही परिस्थिति वरीलप्रमाणेंच होत चालली आहे. डॉलरच्या कक्षेंतील देश तेल घेण्याऐवजीं गळिताचीं धान्यें घेणें अधिक पसंत करतात; तेव्हां निर्यात करणाऱ्या व्यापाऱ्यांना तेलाच्या ऐवजीं हीं धान्येंच त्या त्या प्रमाणांत निर्यात करण्याची परवानगी द्यावी, असें कमिटीचें मत आहे. हिंदुस्थानांतून अमेरिकेला निर्यात होणाऱ्या चहांत घट झाली आहे. चहाची निर्यात वाढविण्यासाठी निर्यातीवरील कर कमी करण्यांत यावा आणि जकात वाढविण्यांत यावी; म्हणजे निर्यात वाढण्यास आणि सरकारच्या उत्पन्नांत भर पडण्यास मदत होईल, असें कमिटीचें मत आहे. ह्याशिवाय चहाच्या वहातुकीच्या संबंधीं सुधारणा करणें, कलकत्त्याला चहा साठवून ठेवण्याची अधिक चांगली व्यवस्था करणें, इत्यादि सूचनाही कमिटीनें केल्या आहेत.

कापडाच्या दर्जाबरहुकूम निर्यातीवर जीं बंधनें घालण्यांत आलीं आहेत तीं काढून टाकण्यांत यावीत आणि निर्यातीवरील दहा टक्के कर रद्द करून त्या ऐवजीं तलम कापडावर जबर जकात बसवून सरकारनें आपली उत्पन्नांतील तूट भरून काढावी, अशी सूचना कमिटीनें केली आहे. हिंदुस्थानांतील कलाकुसरीच्या दुर्मिळ वस्तूंच्या निर्यातीवर सध्या नियंत्रणें नाहींत. तथापि पितळ ह्या धातूच्या वस्तूंवर नियंत्रणें आहेत. अशा प्रकारच्या सर्वच कलाकुसरीच्या वस्तूंच्या निर्यातीसाठीं सर्वसाधारण परवाना देण्यांत यावा, अशी कमिटीची शिफारस आहे. अमेरिकेंत अशा प्रकारच्या वस्तूंना बाजारपेठ मिळणें शक्य आहे. मात्र, त्यासाठीं मालाचा दर्जा आणि तो मिळण्याची शक्यता ह्यांची माहिती अमेरिकेंत प्रसृत केली गेली पाहिजे. हें कार्य करण्यासाठी अमेरिकेंत दोन आणि कानडांत एक, अशीं तीन प्रतिनिधि मंडळें पाठवावीं, व त्यांच्याबरोबर हिंदी कलाकृतींच्या कामाचे नमुनेही मुबलक देण्यांत यावे, असें कमिटीनें सुचविलें आहे. हिंदुस्थानांत तयार होणाऱ्या सतरंज्या व कापड, हीं अमेरिकेंत कशीं काय आवडतात ह्याचा अभ्यास करून त्याप्रमाणें उत्पादनांत योग्य तो बदल करावा, असेंहि कमिटीचें म्हणणें आहे. हिंदुस्थानांतील ग्रामोद्योगाच्या केंद्रांत तयार होणारा माल चांगल्या दर्जाचा असणें इष्ट आहे. तसा तो असेल तरच त्याची निर्यात करणें योग्य होईल. म्हणून, सरकारनें ग्रामोद्योगांच्या विकासाची दिशा दाखविणारें एखादें मंडळ निर्माण करावें असा अभिप्राय कमिटीनें व्यक्त केला आहे.

---

**उद्बोधक विचार**

## " हिंदी साखरेच्या धंद्यास संरक्षण हवें "

"हिंदी साखरेच्या धंद्याला १६ वर्षे परदेशी आयातीवरील जकातीच्या रूपानें संरक्षण दिलें गेलें असलें तरी साखर-उत्पादनाचा खर्च बराचसा कमी होण्यासाठी ( १ ) हिंदुस्थानांतील उसाचें दर एकरीं उत्पादन वाढण्याकरितां ( २ ) लांबी मुदतीनें व अल्प मुदतीनें तयार होणाऱ्या उसाच्या जातींच्या लागवडीचें तंत्र बसविण्याकरितां ( ३ ) साखरेचा उतारा सुधारण्याकरितां ( ४ ) बऱ्याचशा कारखान्यांतून फुकट जाणाऱ्या मोलासेसपासून पॉवर अल्कोहोल बनवून त्याच्या खपाची तजवीज करण्याकरितां नि सदर मोलासेसपासून हरतऱ्हेचें स्पिरीट तयार करण्याकरितां व ( ५ ) साखरकारखान्यांत सांप्रत अनुपयुक्त म्हणून व्याद वाटणाऱ्या अशा अनेक वस्तूंचा उपयोग करून उपधंदे काढण्याकरितां जसा संघटित व सरकारी पुरस्कारानें नि साहाय्यानें प्रयत्न व्हावयास पाहिजे होता तसा ब्रिटिश राजवटींत झाला नाहीं; व संरक्षणाच्या सोळा वर्षांच्या मुदतीपैकीं १४ वर्षें तर ब्रिटिश राजवटींचींच होतीं. या गोष्टी लक्षांत घेतां या धंद्याला आणखी तीन ते पांच वर्षें संरक्षण चालू ठेवून, त्याची अंगभूत सुधारणा घडवून आणणें व त्यायोगें साखरेच्या किंमती उतरविणें अवश्य आहे.

"१९४१ पासून परदेशी साखरेची हिंदुस्थानांत होणारी आयात बंद आहे. सांप्रत सरकारचें धोरण असें आहे कीं, हिंदुस्थानांत साखरेचें पुरेसें उत्पादन होत असल्यानें परदेशी साखर येऊं द्यावयाची नाहीं. परंतु परदेशी साखर येऊं देण्याची लहर हिंद सरकारच्या व्यापारखात्याला केव्हां येईल हें सांगणें, मांजर कोणत्या बाजूला उडी टाकील हें अजमावण्याइतकें कठीण आहे. सबब परदेशी साखर येऊं दिली जात नसली, तरीहि संरक्षण अधिकृत रीत्या चालू ठेवलें जाणें अगत्याचें आहे.

"महाराष्ट्रांत साखरेचा उतारा चांगला आहे. गेल्या मोसमांत बेलापूर साखर-कारखान्याचा उतारा ११·८५ असून अकरा कारखान्यांपकी नऊंचा उतारा ११ टक्क्यांहून अधिक होता. बाजारभाव उतरून मजुरी उतरली, साखर-कारखान्यांतील मळीपासून सरसहा पॉवर अल्कोहोल, स्पिरीट व इतर वस्तूंची निर्मिति होण्यास सरकारनें सवलती दिल्या तर महाराष्ट्रांतील साखरेच्या धंद्याला उत्तर हिंदुस्थानांतील धंद्यापेक्षां खात्रीनेंच सदैव चांगले दिवस दिसतील."

—"संपदा", जानेवारी, १९४९

## बँकांसाठी नियमावली

### मुंबई सरकारनें प्रसिद्ध केलेल्या स्टँडिंग ऑर्डर्स

[ बॉम्बे इंडस्ट्रियल रिलेशन्स ॲक्ट १९४६ खाली प्रांतांतील बँकांसाठी स्थायी नियमावली ( मॉडेल स्टँण्डिंग ऑर्डर्स ) मुंबई सरकारनें गॅझिटांत प्रसिद्ध केली आहे. तिच्या सारभागाचा पहिला हप्ता मागील अंकांत दिला होता. दुसरा व शेवटचा हप्ता येथें दिला आहे. ]

### प्रवेश व अंगझडती

बँकेंत नोकरांनीं अधिकृत मार्गानेंच प्रवेश करावा. बँक सोडतांना अंगझडती घेण्याचा बँकेस अधिकार असून ती निदान दोन तरी माणसांच्या देखत घेतली जाईल. स्त्री नोकरांची झडती त्यांच्या संमतीशिवाय पुरुषमाणसांच्या देखत घेतली जाणार नाहीं.

### अनिवार्य संकटें

आग, पडझड, सांथी, नागरीक प्रक्षोभ वगैरे अघटित व अनिवार्य संकटांच्या प्रसंगीं बँकेला एकदम काम बंद करतां येईल. तसाच बांका प्रसंग असेल तर कोणाहि नोकरास आगाऊ नोटीस न देतां कामावरून कमीहि करतां येईल. परंतु सामान्यपणें अशा प्रसंगीं नोकरवर्ग रजेवर आहे असें समजलें जाईल. प्रत्येक नोकराची जेवढी हक्काची रजा शिलकेंत असेल तेवढी ह्या मुदतींत जमेस धरून उरलेली रजा बिनपगारी समजण्यांत येईल.

### बडतर्फी

कायम नोकर व प्रतीक्षाकालीन नोकर ह्यांना एका महिन्याची नोटीस अथवा एका महिन्याचा, सर्व भत्त्यांसह, पगार देऊन कमी करतां येईल. नोकरीवरून कमी करण्याचीं कारणें नमूद करावीं लागतील. त्या कारणांमुळें बँकेंतील कोणा माणसावर नोकराकडून दिवाणी अगर फौजदारी इलाज केला जाणें मॅनेजर यांना संभवनीय वाटत असेल, असे प्रसंग सोडून अन्य वेळीं नोकरांना कमी करण्याचीं कारणें त्यांना हवीं असल्यास लेखी कळवावीं लागतील. कायम नोकराला स्वतः होऊन नोकरी सोडावयाची असेल तर त्यानेंहि एक महिन्याची आगाऊ नोटीस द्यावी. ती न दिल्यास एका महिन्याच्या सर्व भत्त्यासुद्धां पगाराइतकी नुकसानभरपाई बँकेस मागतां येईल. कायम व प्रतीक्षाकालीन नोकरांशिवाय अन्य वर्गाच्या नोकरांना नोटिशीशिवाय कामावरून कमी करतां येईल व काम सोडूनहि जातां येईल. नोकरींतून कमी केलेल्या अथवा नोकरी सोडून गेलेल्या नोकरांना शक्य तितक्या त्वरित लेखी दाखला सामान्यपणें द्यावा; परंतु सार्वत्रिक कपात, कार्यसमाप्ती, संप अथवा टाळेबंदी अशा प्रसंगीं दाखला न दिला तरी चालेल.

### अपराध व शिक्षा

( १ ) योग्य व न्याय्य आज्ञांचा हेतुपुरस्सर भंग व अधिकाऱ्यांची अमर्यादा ( २ ) बेकायदेशीर संप व त्यास मदत वा उत्तेजन ( ३ ) हेतुपुरस्सर मंद काम वा त्यास मदत वा उत्तेजन ( ४ ) चोरी, कपट, अप्रामाणिकपणा करणें अथवा करूं देणें वा त्याच्याकडे काणाडोळा करणें ( ५ ) बँकेची अथवा तिच्या गिऱ्हाइकांची नगद व कागदी जिंदगी हातीं आली असतां तिचा हिशेब न देणें, काळजी न घेणें अथवा तिचा अपहार करणें ( ६ ) लांच खाणें ( ७ ) परवानगीशिवाय रजेवर राहणें अथवा मुदत संपली तरी रजेवरून परत न येणें ( ८ ) महिन्यांतून चारापेक्षां अधिक वेळां कामावर उशीरा येणें व ठरल्यावेळीं ठरलीं कामें न करणें ( ९ ) बँकेला लागू असलेल्या कायद्यांचा व नियमांचा वरचेवर भंग करणें ( १० ) मॅनेजरांच्या संमतीशिवाय बँकेच्या जागेंत बेकायदेशीर गोष्टींकरितां पैसा जमा करण्याचा प्रयत्न करणें ( ११ ) रोखे, शेअर्स वा माल यांचे सट्टे स्वतः अथवा कोणाच्या तरी मार्फतीनें खेळणें ( १२ ) बँकेच्या कामांत अंतर्भूत नसलेले कामधंदे बँकेच्या वेळांत करणें ( १३ ) बँकेच्या हितसंबंधास बाध येईल अशा गोष्टी वा धंदे करणें ( १४ ) ५, ६, ११, १२ व १३ ह्यांत नमूद केलेल्या प्रमादांना मदत व मूकसंमति देणें ( १५ ) बँकेच्या जागेंत निशापाणी व दंगाधोपा करणें वा असभ्य व गैराशिस्त वर्तन करणें ( १६ ) शिस्तभंग व शिष्टाचार भंग ( १७ ) कामांत निष्काळजीपणा व त्यापासून बँकेस नुकसानी ( १८ ) बँकेच्या कामामुळें ज्ञात झालेली माहिती अनाठायीं अनधिकृतपणें फोडणें ( १९ ) बँकेच्या वा तिच्या गिऱ्हाइकांच्या मालमत्तेचा हेतुपुरस्सर विध्वंस ( २० ) मॅनेजरांच्या संमतीशिवाय बँकेच्या जागेंत अनधिकृत सभा घेणें वा अशा सभेस हजर राहणें ( २१ ) बँकेच्या जागेंत मॅनेजरांच्या परवानगीशिवाय व बेकायदेशीरपणें नोकरसंघाचा प्रचार करणें वा वर्गणी जमा करणें ( २२ ) बँकेच्या जागेंत जुगार खेळणें ( २३ ) बँक अधिकाऱ्यांना, सहकारी नोकरांना व गिऱ्हाइकांना योग्य तो मान न देणें व दाक्षिण्य न दाखविणें ( २४ ) शरीर व कपडे स्वच्छ न ठेवणें—ह्या गोष्टी अपराधांत जमा असून त्याबद्दल ताकीद, दंड, अथवा नोटीस न देतां बडतर्फी ह्यांची शिक्षा दिली जाईल. दंड करण्यापूर्वी नोकरास त्याचें गैरवर्तन लेखी कळवून खुलासा मागविला जाईल. गैरवर्तनाबद्दल बडतर्फी करण्यापूर्वी रीतसर चौकशी करण्यांत येईल. त्यासाठीं त्याला आरोपपत्र दिलें जाईल. त्याला स्वतःला अथवा प्रतिनिधी नेमून आपला बचाव करतां येईल. विरुद्ध बाजूच्या साक्षीदारांची उलटतपासणी घेतां येईल आणि स्वतःचा साक्षीपुरावा हजर करतां येईल. ह्या चौकशीच्या काळांत सदर नोकरास तात्पुरतें कामावरून दूर ठेवतां येईल. जर चौकशीअंतीं त्याला कामावर ठेवण्याचें ठरलें तर त्या मुदतींत तो कामावर होता असेंच मानलें जाईल व त्याला तत्संबंधीचे सर्व फायदे मिळतील.

### तक्रारींचें निराकरण

एकाद्या नोकरास, बँकेंतील अन्य नोकरानें अथवा अधिकाऱ्यानें कांहीं अन्याय केल्यास अथवा त्याचेकडून निष्कारण व बेकायदा जादा काम करवून घेतल्यास त्याला स्वतः अथवा प्रतिनिधीमार्फत मॅनेजर किंवा ह्यासाठीं नेमलेले अन्य अधिकारी ह्यांजकडे तक्रार गुदरवतां येईल. अशा तक्रारींची चौकशी शक्य तितक्या त्वरेनें करावयाची असून ती चालू असतां तक्रार करणाऱ्या नोकरास हजर राहतां येईल. जो निर्णय घेतला जाईल त्याची माहिती त्याला दिली जाईल; तदनुषंगिक हुकुमींची लेखी प्रतहि त्याला मागतां येईल. अधिकाऱ्यानें अंगावर धांवून गेल्याची, शिवीगाळ केल्याची अथवा निकडीच्या प्रसंगीं रजा मंजूर करीत नसल्याची नोकरानें तक्रार केल्यास त्याबद्दलची चौकशी ताबडतोब झाली पाहिजे.

### नोटिसा व प्रसिद्धीपत्रकें

बँकेसंबंधीं नोकरांना द्यावयाच्या जाहीर नोटिसा इंग्रजींत व प्रादेशिक भाषेंत द्याव्या लागतील व एकाद्या नोकरास त्याच्या वैयक्तिक बाबतींत ज्या नोटिसा, हुकूम, आरोपपत्रें वगैरे देणें असतील तीं त्याला समजतील अशा भाषेंत द्यावीं लागतील.

### संदर्भ

ही नियमावली २१ ऑक्टोबर १९४८ च्या बॉम्बे गव्हर्मेंट गॅझेट ( एक्स्ट्रॉ–ऑर्डिनरी ) ( पार्ट १ ) च्या ४६३६–अ ह्या पृष्ठावर प्रसिद्ध झाली आहे.

( समाप्त )

## राष्ट्रीयीकरणाचा खरा अर्थ

राष्ट्रीयीकरणाबाबतच्या सर्वसाधारण कल्पना बऱ्याच स्वैर आहेत. त्यांत, किरकोळ काम करणाऱ्या कामगारानें मालकाच्या बंगल्यांत राहण्यापासून सरकारनें (?) सर्व कामें करावींत व कामगारांना त्यांचे घरीं मनीऑर्डरी पाठविण्यापर्यंतच्या सर्व विचारांच्या सर्व भराऱ्यांचा समावेश होतो!

मजुराचा मालक झाल्याचीं कांहीं उदाहरणें आपल्यांत आहेत, इंग्लंड-अमेरिकेंत तर बरींच आहेत. त्यांत कांहीं वावगेंही नाहीं; उलट कौतुकास्पदच आहे. तसेंच थोड्या श्रमांत पुष्कळ संपत्ति निर्माण करण्याचेच मानवी प्रयत्न आजतागायत चालले आहेत. अमेरिकन कामगार यंत्रांचे सहाय्यानें दर माणशीं खूपच उत्पादन करतो, म्हणून तो इतरांपेक्षां अधिक कार्यक्षम ठरून त्याचा मोबदलाही त्याला भरपूर पगाराचे रूपानें पदरीं पडतो. तथापि मानसिक आणि शारीरिक श्रमाशिवाय—मग त्या श्रमास नांव कोणी कोणतेंही देवो—उत्पादन वा संपत्ति नाहीं असाच जगाचा न्याय दिसतो.

इंग्लंडांतील लोखंड आणि पोलाद या धंद्याचें राष्ट्रीयीकरणाचें बिल सध्या पार्लमेंटमध्यें मांडण्यांत आलें आहे. वर्षाला ५,००० टन लोखंडाचें काम करणाऱ्या अगदीं लहान कारखान्यांना हातही लावण्यांत येणार नाहीं. ५०,००० टनांचें काम करणाऱ्या मध्यम आकाराच्या कारखान्यांना फक्त लायसेन्स काढावा लागणार आहे; इतर कोणताही बदल नाहीं. मोठ्या १०७ कंपन्यांचें १९॥ कोटी पौंडांचें भांडवल खाजगी भागीदारांचें हातून सरकारचे हातीं जाणार आहे—म्हणजे खाजगी मालकी जाऊन जनता मालक होणार आहे. राष्ट्रीयीकरण होणार आहे. या धंद्यांत अंदाजें २॥ लक्ष कामगार गुंतलेले आहेत.

राष्ट्रीयीकरण आलें तरी या १०७ कंपन्यांचीं नांवें व स्वतंत्र अस्तित्व कायमच राहणार आहे. जनतेच्या हिताचे दृष्टीनें जोंपर्यंत काम करतील तोंपर्यंत आज असलेले डायरेक्टर्स पुढेंही काम करतील. सरकार सर्वसाधारण योजना आंखील आणि त्याप्रमाणें सध्याच्याच चालकांनीं कामें करावयाचीं आहेत. असें केल्या कारणानें कारखाना व चालक याबाबत कामगारांच्या व गिऱ्हाइकांच्या दीर्घ काळाच्या संबंधांमुळें निर्माण झालेल्या सद्भावना व हितसंबंध कायम राहून शिवाय चालकांच्या अनुभवाचा फायदाही धंद्याला-सरकारला मिळणार आहे.

राष्ट्रहिताच्या दृष्टीनें कोणी कोणता किती माल काढावयाचा, त्यांच्या किंमती काय असाव्यात, या गोष्टी सरकारी नवीन कॉर्पोरेशननें ठरवावयाच्या आहेत; म्हणजे पार्लमेंटनें व सरकारनें ठरवावयाच्या आहेत. पोलाद वापरणाऱ्या मंडळींच्या निरनिराळ्या कमिट्या असून त्या सरकारला वेळोवेळीं सल्ला देतील. धंद्याच्या वाढीच्या दृष्टीनें तरुण मंडळी निवडणें, त्यांना शिक्षण देणें, संशोधनाची व्यवस्था करणें इत्यादि बाबतींत कॉर्पोरेशनला भरपूर वाव ठेवण्यांत आला आहे. खाजगी भांडवल व स्वार्थ यांचे जागीं सरकारी भांडवल व राष्ट्रहित यांची स्थापना करून इतर बाबतींत बदल न करतां हें राष्ट्रीयीकरण घडवून आणण्याची योजना आहे. यांत मोडतोडीला जागा नाहीं, कामचुकारपणाला अवसर कमी. उलट, कष्टाशिवाय उन्नतीचा दुसरा मार्ग नाहीं याची स्पष्ट स्पष्ट कबुलीच आहे!

—संजय

## व्यापारविषयक बातम्या

**डिसेंबरमधील पोलादाचें उत्पादन**—टाटा आयर्न अँड स्टील कंपनीचें डिसेंबर १९४८ मधील उत्पादन पुढीलप्रमाणें झालें. लोखंड ७८,२०० टन; पोलाद ७७,१०० टन; पोलादाचा तयार माल ५७,३०० टन.

**बर्लिनच्या पुरवठ्यांत फायदा कोणाला?**—बर्लिन शहराची रशिआनें नाकेबंदी केल्यानें अमेरिका व ब्रिटन ह्यांच्या ताब्यांतील बर्लिनच्या भागाला विमानांतून जरूर त्या वस्तूंचा पुरवठा करण्यांत येत आहे. विमानांना लागणारें पेट्रोल अमेरिकन सरकार तेल-कंपन्यांकडून विकत घेत आहे. बर्लिनला करण्यांत येणाऱ्या हवाई पुरवठ्यामुळें ह्या कंपन्यांना प्रचंड नफा होत आहे. अमेरिकन काँग्रेसच्या एका सभासदानें, ह्या कंपन्यांकडून विशेष प्रकारचा जादा नफ्यावरील कर वसूल करण्यांत यावा अशी मागणी केली आहे.

**चहाच्या निर्यातीला बंदी**—चितगांवच्या (पूर्व पाकिस्तान) कस्टम्स कलेक्टरनें एक हुकूम काढून समुद्रमार्गानें हिंदी संघराज्यांत चहाची निर्यात करण्याला बंदी केली आहे, असें समजतें.

**इटलीचा व्यापार**—पाकिस्तान आणि हिंदुस्थान ह्या देशांकडे इटलीचा निर्यात माल अधिक धाडण्याच्या दृष्टीनें इटालिअन व्यापारी प्रतिनिधींचें एक मंडळ पुढच्या महिन्यांत इकडे येणार आहे अशी वार्ता आहे.

**'हरक्युलस' सायकलींची निर्यात**—ब्रिटनमधील 'हरक्युलस' कंपनीकडे हिंदुस्थाननें २,५०,००० सायकलींची मागणी नोंदविली आहे. ह्या कंपनीचें हिंदुस्थान हें सगळ्यांत बडें गिऱ्हाइक आहे. पाकिस्ताननें ५०,००० ते ६०,००० सायकलींची मागणी केली आहे. सिंगापूरला दरमहिना १०,००० सायकली निर्यात होतात. ह्याशिवाय हाँगकाँग आणि दक्षिण-आफ्रिकेकडूनहि मोठ्या मागण्या येत आहेत. तथापि दुष्प्राप्य डॉलर्सची हुंडणावळ मिळविण्याच्या दृष्टीनें युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका, मध्य अमेरिका आणि दक्षिण अमेरिका ह्यांना निर्यातींत अधिक प्राधान्य द्यावें लागतें.

**रेल्वे एंजिनांचा कारखाना**—असनसोलजवळील मिहिजाम येथील, हिंदुस्थान सरकारच्या रेल्वे एंजिनांच्या कारखान्याच उद्घाटनसमारंभ ह्या महिन्याच्या अखेरीस होणार आहे. ह्या कारखान्याच्या उभारणीला सुमारें १४ कोटी रुपये खर्च येणार असून, त्यांत प्रारंभीं एंजिनांचे सुटे भाग तयार करण्यांत येणार आहेत. कारखान्यांत दरवर्षी १२० एंजिनें आणि ५० बॉइलर्स तयार होतील. कारखान्यांत तयार झालेलें पहिलें एंजिन १९५० अखेर अगर १९५१ च्या सुरवातीला रुळावर येऊं शकेल.

**हिंदुस्थानांतील विमानांची रहदारी**—हिंदुस्थानांत सध्या विमान-वहातुक करणाऱ्या कंपन्यांचा एक संघ "एअर ट्रॅन्सपोर्ट असोसिएशन ऑफ इंडिया" ह्या नांवानें लवकरच स्थापन होणार आहे असें समजतें. संघाचें मुख्य कार्यालय नवी दिल्ली येथें राहाणार आहे. हिंदुस्थानांतील आणि हिंदुस्थान-पाकिस्तान, हिंदुस्थान-सीलोन, हिंदुस्थान-ब्रह्मदेश ह्यांच्या दरम्यान चालणारी विमान वहातूक वाढविणें हा ह्या नव्या संघाचा उद्देश आहे.

**महारोग्यांसाठी केंद्रें**—मद्रास सरकारनें मंजूर केलेल्या योजनेप्रमाणें मद्रास शहरांत महारोग्यांच्यासाठी दोन केंद्रें लवकरच उघडण्यांत येणार आहेत. मद्रास कॉर्पोरेशनचें आरोग्यखातें ह्या केंद्रांची व्यवस्था पहाणार आहे.

## नियंत्रणें व वाटप यांची यशस्विता

( भा. म. काळे. )

अर्थव्यवस्थेंतील दोष दूर करून सामान्य नागरिकांचें जीवन सुखी करण्यासाठी नियंत्रणें पुन्हा सुरू करण्यांत आलीं आहेत. कापडाच्या वाटप-पद्धतीलाहि सुरवात झाली आहे. मुख्य अन्नधान्यें व कापड ह्यांचें वाटप सुरू झालें आहे. पोलाद, कागद, सिमेंट ह्या बाबतींतहि भावनियंत्रण ठेवण्यांत आलें आहे. वाटप व नियंत्रणें ह्यांचा उद्देश चलनविस्तार कमी करून महागाई दूर करणें हा आहे. हा मुख्य उद्देश साध्य होण्यासाठी वाटप व नियंत्रणें ह्यांच्या व्यवस्थेंत पूर्णपणें एकसूत्रीपणा असला पाहिजे. हा एकसूत्रीपणा धोरणाच्या दृष्टीनें व खात्याच्या व्यवस्थेच्या आणि संघटनेच्या दृष्टीनेंहि राखला गेला पाहिजे. हा सर्व कारभार यशस्वी होण्याला वहातूक योग्य प्रकारें होणें इष्ट आहे. त्याचप्रमाणें निरनिराळ्या विभागांत धान्य व कापडाविषयक गरजाहि पूर्णपणें लक्षांत आणूनच माल पुरविण्याची व्यवस्था करण्यांत आली पाहिजे. म्हणजेच जनतेच्या मागणीनुसार वस्तूंचा पुरवठा एका मर्यादेपर्यंत झाला पाहिजे. अशी परिस्थिति निर्माण झाल्यास नियंत्रणें व वाटप हळूहळू यशस्वी झाल्याशिवाय रहाणार नाहींत. ही सर्व मूलभूत परिस्थिति लक्षांत घेतां नियंत्रणें व वांटप पद्धति ह्या गोष्टींच्या कारभारामध्यें मध्यवर्ती सरकारकडून एकसूत्रीपणा राखला गेला पाहिजे. प्रत्येक प्रांतानें स्थानिक परिस्थितीचा विचार करून आपल्या गरजांचें स्वरूप निश्चित करावें व मध्यवर्ती सरकारनें सर्व वाटप व नियंत्रण पद्धती आपल्या नेतृत्वाखाली ठेवावी. असें करतांना सर्व व्यवस्थेचा कारभार एका कार्यक्षम अधिकाऱ्याकडे ठेवणेंच योग्य होईल असें वाटतें. वाटप पद्धति व नियंत्रणें यशस्वी होण्यासाठी सरकार अनेक हुकूम प्रसिद्ध करीत आहे. परंतु केवळ हुकुमांच्या प्रसिद्धीनें हें कार्य होणार नाहीं. त्यासाठी मालाचा पुरवठा व लोकांची सहकारिता ह्या सर्वांची विशेष आवश्यकता आहे.

आजच्या परिस्थितींत काळाबाजार दूर झाला पाहिजे. हैद्राबाद येथें भरलेल्या हिंदी आर्थिक परिषदेचे अध्यक्ष प्रो. सिंह ह्यांनींहि आपल्या अध्यक्षीय भाषणांत त्या बाबतींत कांहीं मार्मिक सूचना केल्या. वाटप पद्धति व नियंत्रणें एवढ्यानेंच सर्व परिस्थिति आटोक्यांत येणार नाहीं, तर काळाबाजार नष्ट होण्यासाठी कांहीं लोकांच्या हातीं असलेला जादा पैसाहि उत्पादनाच्या कार्याकडे वळवला पाहिजे किंवा भांडवल गुंतविण्याच्या दृष्टीनें त्याचा उपयोग करण्यांत आला पाहिजे. बँकेंतील बाक्याहि गोठाविण्यांत याव्या व भारी किंमतीच्या नोटा रद्द करण्यांत याव्या असेंहि उपाय त्यांनीं सुचाविले. नियंत्रणें व वाटप-पद्धति यशस्वी होण्याला आज सरकार जेवढें करीत आहे तेवढें करून कार्यभाग होईल असें वाटत नाहीं; व त्यासाठी मालाचें उत्पादन, गिऱ्हाइकांच्या गरजा, स्थानिक वैशिष्ट्यें, रेल्वेची वाहातूक, आर्थिक-दृष्ट्या परवडतील असे बाजारभाव ठेवणें, त्याच बरोबर उत्पादनाला चालना मिळेल अशी व्यवस्था राखणें व पडून असलेला जादा पैसा योग्य कारणीं गुंतविला जाईल असे प्रयत्न करणें ह्या सर्व गोष्टी एकसमुच्चयानें होणें आवश्यक आहे.

---

**मद्रास सरकारला मदत**—मदनपल्ली येथें क्षयरोग प्रति बंधक मोहिम हातीं घेण्याचें मद्रास सरकारनें ठरविलें आहे. हिंद सरकारनें ह्या मोहिमेला संमति दिली आहे. ह्या मोहिमेसाठी ४ लाख रुपये खर्च होणार आहेत.

### पेट्रोलचे बाबतींत परावलंबित्व

पेट्रोलच्या पुरवठ्यावर आधुनिक औद्योगिक राष्ट्रांची अर्थव्यवस्था बऱ्याच प्रमाणावर अवलंबून असते. ज्या राष्ट्रांच्या भौगोलिक मर्यादेंत त्यांना पुरेसें पेट्रोल मिळूं शकतें तीं ह्या बाबतींत विशेष सुदैवीं म्हटलीं पाहिजेत. औद्योगिक जळण आणि मोटार-विमानादिकांच्या वहातुकीचें साधन याचप्रमाणें शेतीच्या यंत्रचलित नांगरांना लागणारें तेल, म्हणून पेट्रोलला फार महत्त्व आहे. हिंदुस्थानला लागणारें पेट्रोल बहुतेक सर्व बाहेरून आणावें लागतें. अर्थातच पेट्रोलच्या बाबतींत हिंदुस्थान परावलंबी आहे. युद्धापूर्वी हिंदुस्थानाला लागणाऱ्या पेट्रोलपैकीं ३७ टक्के तेल ब्रह्मदेशाकडून येत होतें. आतां त्या देशाकडून येणारें पेट्रोल जवळ जवळ बंदच झालें आहे; त्यामुळें पेट्रोलची आयात मध्यपूर्वेकडील देशांतून करावी लागते. १९३९ सालीं हिंदुस्थानांत १६ लाख टन पेट्रोल खपलें; १९४८ सालीं पेट्रोलचा खप २० लाख टनांच्याहिवर गेला, असा अंदाज करण्यांत आला आहे. देशांत पेट्रोलची वांटपपद्धति अनुसरण्यांत आली नसती तर युद्धपूर्वकालांतील वार्षिक सरासरीपेक्षा जवळजवळ दुपटीनें अधिक पेट्रोल लागलें असतें. पेट्रोलसाठीं होणारी ही वाढती मागणी दोन कारणांमुळें उत्पन्न झाली आहे; एकतर औद्योगिकदृष्ट्या पेट्रोलचा जळण म्हणून करण्यांत येणारा उपयोग वाढत्या प्रमाणावर करण्यांत येऊं लागला आहे. पूर्वी कोळशावर चालणाऱ्या कारखान्यांनीं आपली यंत्रसामुग्री पेट्रोलच्या जळणाला उपयोगी पडेल अशी करण्याचे प्रयत्न मध्यंतरीं चालविले होते. पेट्रोलच्या पुरवठ्याची अनिश्चितता लक्षांत घेऊन, अशा कारखानदारांनीं घाई करूं नये असा इषाराहि हिंदुस्थान सरकारला द्यावा लागला होता. दुसरें कारण म्हणजे यंत्रचलित नांगरांचा होऊं लागलेला उपयोग. शेतीसाठी पेट्रोलचा होऊं शकणारा हा उपयोग हिंदुस्थानांत अलीकडेच करण्यांत येऊं लागला तरी त्यामुळें तेलाची मागणी वाढली यांत शंका नाहीं. ह्याशिवाय मोटारींच्या आणि विमानांच्या वाढत्या वहातुकीसाठींहि अधिक तेल लागत आहे. अशा रीतीनें पेट्रोलच्या मागणींत खुप वाढ झालेली असली तरी १९४९ सालीं पेट्रोलचा पुरवठा समाधानकारक राहील असें म्हणतात. गेल्या दोन वर्षांपेक्षा चालू सालचा पुरवठा पुरेसा झाला तर कारखान्यांच्या अडचणींतील एक अडचण तरी तात्पुरती संपली, असें म्हणता येईल.

---

### दि असोसिएटेड सिमेंट कंपनीज लि.

३१ जुलै, १९४८ अखेर संपलेल्या वर्षीं वरील कंपनीला सिमेंट विकून ७ कोटी, ५९ लक्ष रु. मिळाले. एकूण उत्पन्न ८ कोटी, ६७ लक्ष रु. भरलें. पगार व मजुरी ह्यास १ कोटी, ४० लक्ष रु. लागले. कोळसा, पोतीं, कच्चा माल, स्टोर्स, पाणी, वीज, फॅक्टरी खर्च, इत्यादीप्रीत्यर्थ ३ कोटी, ५५ लक्ष रु. खर्ची पडले. घसाऱ्यासाठी ५४ लक्ष रु. बाजूस काढण्यांत आले. करासाठी १ कोटी, १७ लाखांची तरतूद करण्यांत आली. मॅनेजिंग एजंटांचें कमिशन २१ लक्ष, ७२ हजार रु. भरलें. निवळ नफा ७५ लक्ष, ६१ हजार रु. उरला. नफा वाटणीस ५८ लक्ष, ८७ हजार रु. राहिले. भागीदारांस ६% करमाफ डिव्हिडंड वांटण्यास ५२ लक्ष, ८५ हजार रु. लागतील. कंपनीचा ताळेबंद १५ कोटी, २७ लक्ष रुपयांचा आहे. अहवालाचे वर्षीं डायरेक्टरांची फी व प्रवास खर्च ह्यावर २६,६२९ रु. खर्च झाले. ऑडिटरांना १९,६०० रु. दिले.

---

श्री — श्री — श्री — श्री — श्री

श्री

# दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

युद्धोत्तरकालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण
वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के
डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री — श्री — श्री — श्री — श्री

## दि सेन्ट्रल म्युच्युअल विमा कंपनी, लिमिटेड

हेड ऑफिसः—लालगीर चेंबर्स, फोर्ट, मुंबई.

★ नव्या कामाचे मोठे आकडे हेंच केवळ विमा कंपनीच्या यशाचें खरें गमक नव्हे. विमेदारांची योग्य निवड, काटकसरीची शास्त्रशुद्ध पण चोख व्यवस्था याचीच या धंद्यास खरी जरूरी आहे.

आमचा कारभार वरील तत्त्वानुसारच चालतो, याची आजच खात्री करून घ्या.

शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर.

—महाराष्ट्रांतील—
प्रगमनशील व अग्रेसर विमा संस्था

## दि औंध म्युच्युअल इन्शूरन्स सोसायटी लि. पुणें २

—आमचीं वैशिष्ट्यें—

( १ ) काटकसरीचा कारभार ( २ ) खर्चाचें अल्प प्रमाण ( ३ ) क्लेम्स तावडतोब पटविणें ( ४ ) एजंटास कायमचें व वंशपरंपरागत कमिशन ( ५ ) माफक हप्त्याचे दर.

विमा अथवा एजन्सी यासाठी लिहा अगर भेटा.

—मॅनेजिंग डायरेक्टर

रिझर्व्ह बँक.वृत्त

### रिझर्व्ह बँकेचे आगामी गव्हर्नर

सर चिंतामणराव देशमुख ह्यांच्या जागीं हिंदुस्थानचे अमेरिकेमधील वकील सर बेनिगल रामराव ह्यांची रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर म्हणून नेमणूक झाली आहे. १ जुलै रोजीं सर चिंतामणरावांची जागा ते घेतील. बँकेच्या ह्या नव्या प्रमुखास बँकिंगचा कांहींच अनुभव नसला, तरी ते हुशार आहेत. इंडियन टॅक्सेशन इनकायरी कमिटीचे सेक्रेटरी, सायमन कमिशनचे आर्थिक सल्लागार, मुंबई पोर्ट ट्रस्टचे चेअरमन, इत्यादी नात्याचा त्यांचा अनुभव त्यांच्या नव्या कामीं उपयोगी पडेल. रिझर्व्ह बँक आतां सरकारी मालकीची झाल्यावर, तिचे गव्हर्नर रहाण्यास सर चिंतामणराव देशमुख फारसे उत्सुक नाहींत, असें दिसतें.

### बँकेची गोहत्ती येथें शाखा

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या गोहत्ती शाखेचें उद्घाटन ता. १४ रोजीं झालें.

### नव्या सेंट्रल बोर्डाचे सभासद

आतां सरकारी झालेल्या रिझर्व्ह बँकेच्या सेंट्रल बोर्डावरील व लोकल बोर्डावरील डायरेक्टरांच्या नेमणुका जाहीर झाल्या आहेत. ह्या नेमणुका अर्थात् सरकारनेंच केल्या आहेत. सेंट्रल बोर्डाच्या सभासदांत सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास, सर रुस्तुम मसानी, सर मणिलाल नाणावटी, हीं नांवें आढळतात. अमरावतीचे श्री. रामराव माधवराव देशमुख ह्यांसही सेंट्रल बोर्डावर जागा मिळाली आहे. सरकारी अधिकारी म्हणून श्री. के. जी. आंबेगांवकर ह्यांची निवड झाली आहे.

### मुंबई लोकल बोर्डावर प्रा. गाडगीळ व श्री. वर्दे

पश्चिम विभागाच्या लोकल बोर्डावर सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास ( मुंबई ), श्री. कस्तुरभाई लालभाई ( अहमदाबाद ), प्रा. धनंजयराव गाडगीळ ( पुणें ), श्री. रामदेव पोद्दार ( मुंबई ) व श्री. वा. पुं. वर्दे ( मुंबई ) ही मंडळी आहेत.

### श्री. वर्दे व महाराष्ट्र बँक

श्री. वर्दे हे महाराष्ट्र बँकेचे तिच्या स्थापनेपासून उपाध्यक्ष आहेत. सारस्वत बँकेचे ते चेअरमन असून प्रां. सहकारी बँकेचे ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. श्री. वर्दे ह्यांना त्यांच्या ह्या नेमणुकीमुळें महाराष्ट्र बँकेशी असलेला आपला संबंध सोडावा लागणार आहे. भोर स्टेट बँकेचें संचालकत्व त्यांनीं अगोदरच सोडलें आहे असें कळतें.

---

### धान्याची निपज वाढविण्यासाठी कर्जमागणी

हिंदुस्थान सरकारनें इंटरनॅशनल मॉनिटरी बँकेकडून २०० कोटी रुपयांचें कर्ज मागितलें आहे, त्यापैकीं १५ कोटी रुपयांची मागणी मुंबई सरकारनें हिंदुस्थान सरकारकडे करून ठेवली आहे. २०० ट्रॅक्टर्स घण्यासच २ कोटी रु. लागतील. ४०,००० टयूब विहिरींस ४ कोटी रुपये लागतील. ३ लक्ष एकर पडीत जमीन लाग. वडीस उपयुक्त करण्याच्या मोहिमेस ३ कोटी रुपये कमी पडतील.

### रशियानें पूर्व युरोप कसा जिंकला ?

"खरोखर एकाच अर्थानें रशियानें पूर्व युरोपवर आक्रमण केलें आहे. त्यानें पूर्व युरोपवर कल्पनांच्या सहाय्यानें वर्चस्व बसविलें आहे. काम मिळण्याचा हक्क, केलेल्या कामाचा योग्य मोबदला मिळण्याचा अधिकार, कामानंतर विश्रांति मिळण्याचा अधिकार, आरोग्य–शिक्षण–नोकरीचें सातत्य हीं मिळण्याचा हक्क, सर्व स्त्री-पुरुषांस व सर्व वर्णांच्या लोकांना आयुष्य सुखानें जगण्याचा अधिकार, ह्या कल्पनांनींच रशियानें पूर्व युरोप पादाक्रांत केला आहे. ":–डीन ऑफ कँटरबरी, डॉ. ह्युलेट जॉनसन.

नवीन पुष्कळ निघाले, तरी
तुळजाराम मोदी,
सातारा
ह्यांचें पुढारीपण कायम आहे.









## पुणें पोस्टल को. बँकेंत श्री. कुळकर्णी यांचा सत्कार



श्री. के. आर. कुळकर्णी, एम्.ए. चीफ ऑडिटर व फिनें. अडव्हायसर.

मे. के. आर. कुळकर्णी, एम. ए., चीफ ऑडिटर व फायनॅन्शिअल अडव्हायसर, को. ऑ. खातें, मुंबई इलाखा, पुणे हे सरकारी नोकरींतून सेवानिवृत्त होत असलेमुळें, पुणें पोस्टल को. ऑ. बँकेनें आपले बँकेचे सभागृहांत गुरुवार तारीख ६ माहे जानेवारी सन १९४९ इ. रोजीं सायंकाळीं ६-३० वा. त्यांचा सत्कार केला. त्यावेळीं सहकारी खात्यांतील अधिकारी, इतर सहकारी संस्थांतील डायरेक्टर्स, बँकेचे सभासद वगैरे बराच मोठा समुदाय हजर होता. अध्यक्षस्थानीं डे. डिव्हिजनल इंजिनीअर टेलिग्राफ्स पुणें, मे. जी. बी. पुजारी, बी. एससी. हे होते. प्रथमारंभीं श्री. ग. म. प्रधान यांनीं बँकेचेतर्फे उपस्थित गृहस्थांचें व सन्मान्य पाहुण्यांचें हार्दिक स्वागत केलें. त्यांनीं आपल्या भाषणांत श्री. कुळकर्णी यांनीं बँकेचे इमारतीबाबत व निर्दोष हिशेब पद्धतीबद्दल वेळोवेळीं कशी मदत केली हें विशद करून सांगितलें. त्यांचे बँकेचे तपासणींतील विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे हिशेबांतील चुका अगर दोष दाखविणें ही नसून बँकेचे कामांत मार्गदर्शक सूचना करणें व त्या अमलांत आणण्यास आपल्या अधिकाराप्रमाणें मदत करणें हीच प्रामुख्यानें आहे, हें त्यांनीं दोन-तीन उदाहरणें दाखवून सांगितलें. श्री. प्र. वा. कुळकर्णी, बँकेचे सन्मान्य चिटणीस, यांनीं बँकेची त्रोटक माहिती सांगितली. श्री. ग. के. जोशी यांनीं सांगितलें कीं, बँकेस स्वतःचे मालकीची इमारत असावी ही कल्पना श्री. कुळकर्णी यांनीं आपले तपासणी-यादींत लिहून त्याबाबत पैशाची योजना कशी करावयाची वगैरे बाबतींत माहीती देऊन, आमचे मालकीची दोन मजली इमारत आमचे नफ्यांतून पूर्ण करून दिली. त्यानंतर सन्मान्य पाहुणे श्री. कुळकर्णी यांना हारतुरे घालून त्यांचा सत्कार केला.

श्री. कुळकर्णी यांनीं आपले भाषणांत, सहकारी खात्यांतील अधिकाऱ्यांचें काम मिशनरी पद्धतीचें असतें. बँकेच्या चालक वर्गाची कर्तबगारी समजावून घेऊन त्यांना योग्य तो सल्ला द्यावा लागतो; मी केलेल्या सूचना ह्या संस्थेच्या चालक मंडळीस पटल्या व त्यांनीं त्या अमलांत आणिल्या म्हणूनच ही त्यांची इमारत झाली, त्यांत मीं कांहींच केलें नाहीं; असें सांगून चालक मंडळींनीं त्यांच्या केलेल्या सत्काराबद्दल त्यांनीं आभार मानले. शेवटीं आभारप्रदर्शन होऊन मे. कुळकर्णी सध्यां को-ऑ. ट्रेनिंग कॉलेजमध्यें प्राध्यापक म्हणून काम करीत असलेमुळें त्यांची येथून पुढेंही आम्हांस सल्लामसलत मिळत जाईल, अशी आशा प्रदर्शित करून त्यांना दीर्घायुष्य व आरोग्य चिंतून अध्यक्षांनीं सभा बरखास्त केली. पानसुपारी, अत्तरगुलाब व चहापान होऊन हा गोड समारंभ संपला.


### दि सांगली स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

(स्थापना सन १९२७)


| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ५,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | १,७६,१०० रु. |
| भरलेलें भांडवल | १,०३,२५० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,१७,००० रु. |
| खेळतें भांडवल | ११,००,००० रु. |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासदांना, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागीदारांना योग्य तारणावर कर्जे दिलीं जातात. सोन्याचे तारणावर सवलतीचे व्याजाचे दरानें कर्ज दिलें जातें. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा व इंडिया इक्विटेबल इं. कं. लि. कलकत्ता, या कंपन्यांचे विम्यांचे हप्ते स्वीकारले जातात. चेक-हुंड्यांची खरेदी-विक्री, सरकारी कर्जरोखे व शेअर्स यांची खरेदी-विक्री व व्याज-वसुली वगैरे

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

ना. पां. ठाणेदार
मॅनेजर





अधिक धान्य पिकविण्याची योजना
—यशस्वी होण्यास—
### किर्लोस्कर पंपिंग सेट्स
हें अमोघ साधन आहे.
त्याचें सहाय घ्या !

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाविलास,' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.